भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात उपकर अधिनियम, १९८५

**(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक ३)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Agricultural and Processed Food Products Export Cess Act, 1985

**(Act No. 3 of 1986)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ४.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि अॅग्रिकल्चरल अॅन्ड प्रोसेस्ड फूड प्रॉडक्टस् एक्सपोर्ट सेस अॅक्ट, १९८५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ २३ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Agricultural and Processed Food Products Export Cess Act, 1985 as on the 31st January 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January 2003 on pages 23.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात उपकर अधिनियम, १९८५

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अनुसूचीत पदार्थांचे सीमा शुल्क.

४. भारताच्या एकत्रित निधीत शुल्काचे उत्पन्न जमा करणे.

एच ४१२९—२ (१०३५—१-२००४)

# कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात उपकर अधिनियम, १९८५

## (१९८६ चा अधिनियम क्रमांक ३)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[८ जानेवारी, १९८६]

**विवक्षित कृषि व संस्कारित अन्न पदार्थ यांच्या निर्यातीचा विकास व प्रचालन यासाठी उपकराच्या रूपाने त्यांच्या निर्यात सीमाशुल्काची आकारणी व वसुली करण्यासाठी आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

ह्या अधिनियम, भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी संसदेकडून अधिनियमित होवो :—

१. (१) ह्या अधिनियमास "कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात उपकर अधिनियम, १९८५" असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा अधिनियम, केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. (१) ह्या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—— व्याख्या.

(क) "प्राधिकरण" याचा अर्थ, कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५ याच्या कलम ४ खाली स्थापित कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात विकास प्राधिकरण, असा आहे,

(ख) "अनुसूचित पदार्थ" याचा अर्थ, कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५ याच्या अनुसूचीमध्ये त्यावेळी समाविष्ट केलेले कोणतेही पदार्थ, असा आहे.

(२) ह्या अधिनियमामध्ये वापरलेले, व्याख्या न केलेले परंतु, कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५ मध्ये व्याख्या केलेले सर्व शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमात जे अर्थ नेमून दिलेले असतील, अनुक्रमे तेच अर्थ असतील.

३. (१) कृषि व संस्कारित अन्न पदार्थ विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५ याच्या प्रयोजनासाठी, उपकराच्या स्वरूपात केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे **राजपत्रामध्ये** विनिर्दिष्ट करील अशा तीन टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही अशा दराने मूल्यानुसार सीमाशुल्क जे निर्यात करण्यात येणाऱ्या सर्व अनुसूचित पदार्थांवर आकारण्यात येईल व वसूल करण्यात येईल. अनुसूचित पदार्थांचे सीमाशुल्क.

(२) पोटकलम (१) खाली अनुसूचित पदार्थांवर आकारण्यात येणारे सीमाशुल्क अशा अनुसूचित पदार्थांवर त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे आकारणीयोग्य असणारा कोणताही उपकर किंवा शुल्क याच्या व्यतिरिक्त असेल.

(३) सीमा शुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२) याचे उपबंध व त्याखाली तयार करण्यात आलेले नियम व विनियम तसेच, शुल्काचा परतावा व शुल्कातील सूट या संबंधातील नियम याचे उपबंध हे पोटकलम (१) अन्वये आकारणीयोग्य असलेल्या सीमाशुल्काच्या आकारणीस व वसुलीस शक्यतोवर जसे ते, त्या अधिनियमाखालील किंवा त्या नियमाखालील व विनियमाखालील सीमाशुल्काच्या आकारणीस व वसुलीस लागू होतात तसेच, लागू होतील.

४. कलम ३ खाली आकारणी केलेल्या सीमाशुल्काचे उत्पन्न प्रथम भारताच्या एकत्रीकृत निधीत जमा करण्यात येईल आणि संसदेने त्यासंबंधातील कायद्याद्वारे केलेल्या विनियोजनाद्वारे व तशी तरतूद केल्यास, केंद्र सरकार अशा उत्पन्नामधून वसुलीचा खर्च वजा करून त्याला योग्य वाटेल अशा रकमा वेळोवेळी प्राधिकरणाकडे कृषि व संस्कारित अन्न पदार्थ निर्यात विकास प्राधिकरण अधिनियम, १९८५ च्या प्रयोजनासाठी वापरण्याकरिता देईल. भारताच्या एकत्रीकृत निधीत शुल्काचे उत्पन्न जमा करणे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई